श्री पंचाक्षरी विद्यावर्धक संस्था, माळकवठे, जि.सोलापूर या संस्थेव्दारा संचलित (१) श्री पंचाक्षरी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, माळकवठे, ता.द.सोलापूर, जि.सोलापूर (२) श्री पंचाक्षरी प्रशाला (कन्नड माध्यम), टाकळी ब्रीज, ता.द.सोलापूर, जि.सोलापूर या दोन्ही शाळांचे श्री गुरू पंचाक्षरी बृहन्मठ माळकवठे, जि.सोलापूर या संस्थेकडे झालेल्या व्यवस्थापन बदलाबाबत शासकीय अभिलेख्यातील नोंदी सुधारित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्राशाह ३०१८/प्र.क्र.३९०/एसएम-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २६ जुलै, २०१९

<u>वाचा :</u> शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक माशाह २०११/ (२१०/११) माशि-३, दि.१७/०२/२०१२

<u>संदर्भ:</u> विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे जा.क्र.शिउसं/माध्य-३०३/शाळा हस्तांतरण/ पुवि/ २०१८/४९३३, दिनांक ११ जुलै, २०१८ चे पत्र.

<u>प्रस्तावना :</u>

श्री पंचाक्षरी विद्यावर्धक संस्था, माळकवठे, जि.सोलापूर या संस्थेव्दारा संचलित (१) श्री पंचाक्षरी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, माळकवठे, ता.द.सोलापूर, जि.सोलापूर (२) श्री पंचाक्षरी प्रशाला (कन्नड माध्यम), टाकळी ब्रीज, ता.द.सोलापूर, जि.सोलापूर या दोन्ही शाळांचे श्री गुरू पंचाक्षरी बृहन्मठ माळकवठे, जि.सोलापूर या संस्थेस हस्तांतरण करण्याचा प्रस्ताव संदर्भाधीन पत्रान्वये शासनास मंजूरीसाठी सादर केला आहे. श्री पंचाक्षरी विद्यावर्धक संस्था, माळकवठे, जि.सोलापूर नोंदणी क्र.एफ-११८६/सोलापूर या संस्थेचे श्री गुरू पंचाक्षरी बृहन्मठ, माळकवठे, जि.सोलापूर या संस्थेमध्ये विलीनीकरण करण्यास सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर यांनी अर्ज क्र.२४/२०१६ मध्ये दिनांक २/०६/२०१७ अन्वये मान्यता दिली आहे. सदर विलीनीकरणानंतर मूळ संस्थेची सर्व स्थावर/ जंगम मालमत्ता (शाळा इमारत व साहित्यासहीत) यांचे श्री गुरू पंचाक्षरी बृहन्मठ, माळकवठे, जि.सोलापूर या संस्थेस हस्तांतरण होऊन व्यवस्थापन बदल झालेला आहे. तथापि शाळा मान्यता हस्तांतरीत करण्याचे अधिकार शासनास असल्याने, सदर दोन शाळांचे श्री गुरू पंचाक्षरी बृहन्मठ, माळकवठे, जि.सोलापूर या संस्थेकडे हस्तांतरीत करण्याचा प्रस्ताव विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी सादर केला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्याबाबत शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय :</u>

मा.सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर यांनी अर्ज क्रमांक २४/२०१६ वर सदर दोन्ही संस्थांच्या एकत्रित करण्याबाबत दिनांक २/०६/२०१७ अन्वये दिलेल्या निर्णयाच्या अधीन राहून, श्री पंचाक्षरी विद्यावर्धक संस्था, माळकवठे, जि.सोलापूर या संस्थेव्दारा संचलित (१) श्री पंचाक्षरी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, माळकवठे, ता.द.सोलापूर, जि.सोलापूर (२) श्री पंचाक्षरी प्रशाला (कन्नड माध्यम), टाकळी ब्रीज, ता.द.सोलापूर, जि.सोलापूर या दोन्ही शाळांची संचालन करणारी संस्था म्हणून श्री गुरू पंचाक्षरी बृहन्मठ माळकवठे, जि.सोलापूर या संस्थेची नोंद घेण्यास व सदर शाळासंबंधीच्या शासकीय अभिलेख्यातील सर्व नोंदी त्यानुसार सुधारित करण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे. सदर नोंद घेताना खालील बाबींची पूर्तता करण्यात यावी. :-

(१) सदर दोन्ही शाळांचे वर्ग/ तुकडया आदेशाबाबत खात्री करण्यात यावी.

(२) ज्या अटींवर मूळ संस्थेस शाळा सुरू करण्यासाठी परवानगी दिलेली आहे, त्यानुसार सदर आदेशांनुसार नवीन संस्थेकडे शाळा हस्तांतरीत झाल्यानंतर त्या अटींमध्ये बदल होणार नाही, यासंदर्भात नवीन संस्थेचे अध्यक्ष/ सचिवांच्या स्वाक्षरीने बाँडपेपरवरील नोडराईज्ड शपथपत्र घेण्यात यावे.

(३) शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्यात येईल व त्यांच्या सेवाशर्तीत बदल करण्यात येणार नाहीत. याबाबत नवीन संस्थेचे अध्यक्ष/ सचिव यांचे रू.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर नोटरी केलेले शपथपत्र घेण्यात यावे.

(४) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार व याबाबत शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या आदेशानुसार दोन्ही शाळांसाठी पक्की इमारत, आवश्यक सर्व भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. याबाबत नवीन संस्थेचे अध्यक्ष/ सचिव यांचे रू.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर नोटरी केलेले शपथपत्र घेण्यात यावे.

(५) शासन निर्णय, दि.२८/०८/२०१५ मधील संचमान्यतेच्या सुधारीत निकषांनुसार व याबाबत शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या आदेशानुसार अनुज्ञेय असलेल्या पदांइतके शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी शाळेत कार्यरत राहतील व त्यापेक्षा जास्त शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत राहणार नाहीत, हे संस्थेवर बंधनकारक राहील. तसेच, जादा शिक्षकांच्या समायोजनाची कार्यवाही करणेबाबत व अनुज्ञेय पदांपैकी रिक्त पदे अतिरिक्त कर्मचाऱ्यांमधून भरण्याबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करणे आवश्यक राहील.

(६) शासनाकडून शाळा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, वेतन/ वेतनेतर अनुदान, विद्यार्थी इ. बाबत वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, शासन निर्णय व आदेश इ. चे पालन करणे नवीन संस्थेवर बंधनकारक राहील.

२. वरील बाब क्रमांक (१) ते (६) ची पूर्तता झाल्यावर विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांचेकडील अभिलेख्यांत संस्थेच्या नावातील बदलाबाबत पुढील आवश्यक कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७२६१४४२२१६३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2019.07.26 14:51:23 +05'30'

(प्रविण मुंढे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) शिक्षण संचालक (प्राथमिक/ माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर.
४) अध्यक्ष/ सचिव, श्री पंचाक्षरी विद्यावर्धक संस्था, माळकवठे, जि.सोलापूर
५) अध्यक्ष/ सचिव, श्री गुरू पंचाक्षरी बृहन्मठ माळकवठे, जि.सोलापूर
६) निवडनस्ती (एसएम-१).